**भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील पारसी धर्मियांसाठी वारसाचे नियम**

भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ मधील प्रकरण तीन, कलम ५० ते ५६ मध्ये मृत्युपत्र न करता मृत झालेल्या पारसी धर्मीय व्यक्तीचे वारसाहक्क नियमांबाबत तरतुद आहे.

**कलम ५० :** मृत्यूपत्र न करता मयत झालेल्या व्यक्तीच्या वारसाबाबत सर्वसाधारण नियम असे आहेत-

**अ)** पारसी धर्मात, मृत व्यक्तीच्या हयातीत जन्मलेले अपत्य व मृत्यूसमयी पत्नीच्या गर्भात असणारे परंतू त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर जिवंत जन्मलेले अपत्य असा भेद केला जात नाही.

**ब)** पारसी धर्मात, मृत व्यक्तीचे जे मयत अपत्य कोणतेही वारस न मागे ठेवता मयत झाले आहेत अशांचा मिळकतीचे हिस्से पाडताना विचार केला जात नाही.

**क)** पारसी धर्मात, जेव्हा व्यक्तीच्या मयत वारसाची विधवा, मयत व्यक्तीच्या हयातीत, पुनर्विववाह करते तेव्हा तिला वारसा हक्क मिळत नाही.

**कलम ५१ :** १) उपकलम २ मधील तरतुदीस अधीन राहून मृत पारसी पुरुषांच्या मिळकतीची विभागणी खालीलप्रमाणे होईल :

**अ)** पारसी वारसा कायद्यान्वये, जेव्हा मयत पारशी पुरुषामागे त्याची विधवा पत्नी व मुले आणि मुली असतात तेव्हा प्रत्येक मुलगा आणि विधवा पत्नी यांना प्रत्येक मुलीच्या दुप्पट हिस्सा मिळेल. अथवा

**ब)** जेव्हा मयत पारशी पुरुषामागे विधवा पत्नी नाही पण फक्त मुले आणि मुली आहेत अशावेळी प्रत्येक मुलाला प्रत्येक मुलीच्या दुप्पट हिस्सा मिळेल. अशा पद्धतीने मिळकतीचे विभाजन केले जाईल.

पारसी धर्मात 'मुलगा' आणि 'मुलगी' या संज्ञेत सावत्र किंवा दत्तक मुलगा किंवा मुलगी यांचा समावेश होत नाही. परंतू या संज्ञेत मयत मुलगा किंवा मुलगी यांचा समावेश असू शकतो.

पारसी धर्मानुसार सावत्र मुलगा किंवा मुलगी म्हणजे त्या माता किंवा पित्याचे पूर्वी झालेल्या लग्नापासून झालेले आपत्य. अशा आपत्याला सावत्र माता किंवा सावत्र पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क मिळत नाही.

दत्तकाबाबतही पारसी धर्मात काटेकोर नियम नाहीत. पारसी धर्मात अंत्यविधी करण्यासाठी दत्तक घेतले जाते. पारसी धर्मात दत्तक आपत्याला 'पलुक पुत्र' किंवा 'धर्मपुत्र' म्हणतात. 'पलुक पुत्राची' नेमणूक, पारसी व्यक्ती हयात असतांना केली जाते तर 'धर्मपुत्राची' नेमणूक पारसी व्यक्ती मयत झाल्यानंतर अंत्यविधी कार्य करण्यासाठी केली जाते.

दत्तक आपत्याला दत्तक घेणाऱ्या माता किंवा पित्याच्या मिळकतीत वारसा हक्क मिळत नाही. मृत्यूपत्रानुसार दत्तक आपत्याला काही मिळकत दिली जाऊ शकते.

२) जेव्हा मृत पारसी पुरुषामागे त्याची आई व वडील किंवा दोघेही जिवंत असतील, शिवाय मुले, मुली किंवा विधवा पत्नी व मुले, मुली असे वारस असतात तेव्हा वरील नियमाप्रमाणे मिळकतीचे हिस्से पडतात. मात्र वडील जिवंत असल्यास त्यांना मृताच्या मुलास मिळणाऱ्या हिश्याचा अर्धा भाग व आई जिवंत असल्यास तिला मृताच्या मुलाला मिळणाऱ्या हिश्याचा अर्धा भाग इतका हिस्सा मिळेल असे मिळकतीचे विभाजन केले जाईल.

**कलम ५२ :** जेव्हा पारसी स्त्री मृत्यूपत्र न करता मृत होते तेव्हा तिच्या मिळकतीचे वारस खालीलप्रमाणे ठरविले जातात:

**अ)** जेव्हा मृत पारसी स्त्रिच्यामागे तिचे पती व मुले, मुली राहतात तेव्हा त्या सर्वांना समान हिश्याने तिची मिळकत मिळते.

**ब)** जेव्हा मृत पारसी स्त्रिच्यामागे पती नसतात व फक्त मुले आणि मुली असतात तेव्हा त्या प्रत्येकाला मयत स्त्रिच्या मिळकतीत समान हिस्सा मिळतो.

**कलम ५३ :** जेव्हा पारसी व्यक्ती, मागे अपत्ये ठेवून मयत होते आणि एखादे अपत्य मयत असल्यास असे मयत आपत्य जर जिवंत असते तर त्याला मयताच्या मिळकतीचा मिळाला असता अशा हिश्याचे वाटप त्या मयत आपत्याच्या वारसांमध्ये होते.

**अ)** जर पूर्वमृत अपत्य असेल तर त्याची विधवा पत्नी व मुले, मुली यापूर्वी चर्चीलेल्या नियमाप्रमाणे त्याच्या मिळकतीत हिस्से घेतील. मात्र जर पूर्वमृत मुलामागे त्याची विधवा व त्याच्या मुलाची विधवा यांच्याशिवाय कुणी अपत्य अगर अपत्यजन्य वारस नसेल तर त्याला मिळालेला हिस्सा पूर्वमृत व्यक्तीचा हिस्सा न समजता तो पारसी व्यक्तीच्या मिळकतीचा भाग समजून यापूर्वी चर्चीलेल्या नियमाप्रमाणे विभागला जाईल. म्हणजे पारसी व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन करताना पूर्वमृत मुलांचा विचार केला जाणार नाही.

**ब)** जर मृत पारसी व्यक्तीचे पूर्वमृत अपत्य मुलगी असेल तर तिच्या हिश्याची मिळकत तिच्या मुलामुलींमध्ये समानपद्धतीने विभागली जाईल.

**क)** जर मृत पारसी व्यक्तीच्या हयातीत त्याच्या पूर्वमृत मुलाच्या मुलाचा अथवा पूर्वमृत मुलाच्या मुलीचा मृत्यू झाला असेल तर त्यांचा हिस्सा वरील 'अ' आणि 'ब' मधील तरतुदीप्रमाणे त्यांच्या वारसांकडे संक्रमीत होईल.

**ड)** जर मृत पारसी व्यक्तीला जवळचे कुणी वारस नसतील तसेच वंशावळीतील अगदी दूरचा वारसही मयत असेल तेव्हा त्याच्या वारसाला हिस्से देताना वरील 'क' मधील तरतूद लागू पडेल.

**कलम ५४ :** जर मृत पारसी व्यक्तीच्या मागे फक्त त्याची विधवा पत्नी अगर तिचा विधूर पती अगर एखाद्या अपत्याची विधवा असे वारस असतील तेव्हा अशा व्यक्तीच्या मिळकतीचे विभाजन खालील नियमाप्रमाणे केले जाते.

**अ)** जर मृत पारसी व्यक्तीमागे फक्त त्याची विधवा अथवा विधूर हेच वारस असतील तेव्हा अशा वारसांना मृत व्यक्तीच्या मिळकतीतील अर्धा हिस्सा मिळतो.

**ब)** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे त्याची विधवा किंवा विधूर याशिवाय त्यांच्या अपत्याची विधवाही वारस असेल तर प्रथम मृत व्यक्तीच्या विधवा अथवा विधूरास मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) हिस्सा मिळेल. नंतर तिच्या पूर्वमृत अपत्याच्या विधवेला त्या मिळकतीतील १/३ (एक त्रित्यांश) हिस्सा दिला जाईल. (पूर्वमृत अपत्याच्या विधवा एकापेक्षा जास्त असतील तर त्यांचा १/३ हिस्सा त्यांच्यामध्ये समान प्रमाणात विभागून दिला जाईल.)

**क)** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे फक्त त्याच्या पूर्वमृत अपत्याची विधवाच वारस असते तेव्हा तिला त्याच्या मिळकतीतील २/३ भाग समान प्रमाणात विभागला जाईल.

**ड)** वरील अ, ब, किंवा क प्रमाणे मृत पारसी व्यक्तीच्या मिळकतीचे वाटप केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या मिळकतीचे विभाजन मृत व्यक्तीच्या परिशिष्ट दोन मधील भाग १ च्या नातेवाईकांमध्ये त्यांच्या क्रमानुसार केले जाते, असे विभाजन करताना एकाच पिढीतील पुरुषांना त्याच पिढीतील स्त्री वारसापेक्षा दुप्पट हिस्सा मिळतो.

## परिशिष्ट - दोन

### *भाग एक (कलम ५४)*

१. वडील आणि आई
२. भाऊ आणि बहिणी (दुध भाऊ-बहिणी वगळून) तसेच पूर्वमृत भाऊ बहिणीची मुले-मुली.
३. वडीलांचे वडील (आजोबा) आणि वडीलांची आई (आजी)
४. वडीलांच्या वडीलाचे वडील (पजोबा) वडीलांच्या आईची आई (पणजी)
५. पणजोबाची मुले-मुली आणि ते पूर्वमृत असल्यास त्यांची मुले-मुली.

**इ)** जर शिल्लक राहिलेल्या मिळकतीसाठी पात्र ठरविलेले वारस उपलब्ध नसतील तर ती मिळकत या कलमामधील तरतुदीनुसार पात्र ठरविलेल्या वारसांना मिळते.

**कलम ५५ :** जेव्हा मृत पारसी व्यक्तीमागे त्याची विधवा, विधूर, अपत्य, अपत्याचे अपत्य अगर अपत्याची विधवा यांपैकी कोणीही वारस उपलब्ध नसेल तर अशा मृत व्यक्तीची मिळकत परिशिष्ट दोन मधील भाग- दोन मध्ये उल्लेखिलेल्या नातेवाईकांना त्यांच्या परिशिष्टातील क्रमाने मिळते आणि त्यामधील प्रत्येक पुरुष वारसाला स्त्री वारसाच्या दुप्पट हिस्सा मिळतो.

### *भाग दोन (कलम - ५५)*

१. वडील आणि आई
२. भाऊ आणि बहिणी (दुध भावंडे वगळून) तसेच पूर्वमृत भावंडांची मुले.
३. वडील आजोबा आणि आजी.
४. वडील आजोबांची मुले-मुली आणि जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
५. वडील पणजोबा आणि पणजी
६. पणजोबांची मुले-मुली आणि जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
७. दुध भावंडे आणि त्यांच्यापैकी पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
८. आई आजोबा आणि आई आजी

९. आई आजोबांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१०. भावांच्या आणि अर्धरक्त भावांच्या विधवा.
११. वडील आजोबांच्या मुलाची विधवा पत्नी.
१२. आई आजोबांच्या मुलाची विधवा पत्नी.
१३. मृत व्यक्तीच्या हयातीत पुनर्विवाह न केलेले मृत व्यक्तीच्या पूर्वमृत मुलीचे विधूर पती.
१४. आईच्या आजोबाचे वडील आणि आई. (आई पणजोबा-पणजी)
१५. आई पणजोबांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१६. आई आजीची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जे पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.
१७. वडील आजीचे आई वडील.
१८. वडील आजीचे वडीलांची मुले-मुली आणि त्यांच्यापैकी जी पूर्वमृत असतील त्यांची मुले-मुली.

**कलम ५६ :** जेव्हा वरील तरतुदींप्रमाणे मृत पारसी व्यक्तीच्या मिळकतीस पात्र ठरविलेले वारस नसतात तेव्हा ते मिळकत मृत व्यक्तीच्या नात्यातील जवळच्या व्यक्तीमध्ये समप्रमाणात विभागली जाते.

♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦♦